# मेट्रोवरील बाह्य जाहिरातींमध्ये दिसणार कल्पकता



**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या भुयारी मेट्रोरेलचे कार्यचलन करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने टाइम्स इनोव्हेटिव्ह मीडिया लिमिटेडला १५ वर्षांच्या कालावधीसाठी बाह्य जाहिरातीचा अधिकाराचा परवाना दिला आहे. यामध्ये २७ स्थानके, ३१ गाड्या, अन्सिलरी इमारतींमधील एकूण २० हजार चौरस मीटर जागेसह स्थानकांच्या नाम अधिकारांचाही समावेश आहे. बाह्य जाहिरातीकरिता निविदा प्रक्रिया राबवण्यात आली, ज्यामध्ये सहा कंपन्यांनी सहभाग घेतला. यामध्ये टाईम्स ही कंपनी विजेती ठरली.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने अर्थात एमएमआरसीएलने यापूर्वी स्थानक नाम अधिकार, टेलिकॉम इन-बिल्डिंग सोल्युशन्स, ऑप्टिकल फायबर केबल्सच्या निविदा काढल्या आहेत. सुमारे दीड लाख चौरस फुटांच्या व्यावसायिक जागांच्या परवान्यासाठीच्या निविदा खुल्या आहेत व त्यास उत्तम प्रतिसाद मिळत आहे. एमएमआरसीएलने ऑक्टस ॲडव्हायझर्स-स्टुडिओ ढडऊ कन्सोर्टियम यांना सर्व मेट्रो-३ चाय नॉन-फेअर बॉक्स द्वारे होणाऱ्या महसूल प्राप्तीसाठी करण्यात येणाऱ्या विविध कामांसाठी सल्लागार म्हणून नेमले आहे. मुंबईच्या पहिल्या पूर्णतः भूमिगत मेट्रो मार्ग ३ चे पहिल्या टप्प्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे. कफ परेड ते आरेपर्यंत २७ स्थानकांद्वारे हा मेट्रो मार्ग जोडला गेला आहे. ही मार्गिका बीकेसी, विमानतळ टर्मिनल १ आणि टर्मिनल २, वरळी, दादर, सिद्धिविनायक, सीएसएमटी, चर्चगेट, हुतात्मा चौक आणि विधान भवन यांसारख्या शहरातील प्रमुख ठिकाणांना जोडते.